मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवडमध्ये तिरंगा रॅलीचा उत्साह

## राष्ट्रप्रेमी, माजी सैनिक, राजकीय नेते, हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग




**पिंपरी | प्रतिनिधी**

'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वीतेचा जल्लोष आणि भारतीय सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरात एका भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीत मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, शिवसेना शहरप्रमुख (शिंदे गट) बाळासाहेब वाल्हेकर, आरपीआयचे कुणाल वाव्हळकर, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, माजी स्थायी समिती अध्यक्ष नितीन लांडगे, सीमाताई सावळे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, केशव घोळवे, सचिन चिंचवडे, शीतल शिंदे, विकास डोळस, संदीप वाघेरे, सुरेश भोईर, बाबासाहेब त्रिभुवन, सागर आंघोळकर, राजेंद्र लांडगे, सागर गवळी, योगेश लोंढे, राम वाकडकर, माजी नगरसेविका सुजाता पालांडे, सुलभा उबाळे, शर्मिला बाबर, अनुराधा गोरखे, निर्मला कुटे, मोनाताई कुलकर्णी, आशाताई शेंडगे, आरतीताई चोंधे, कुंदा भिसे, माजी सैनिक देविदास साबळे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे, माऊली थोरात, संजय मंगोडेकर, अजय पाताडे यांच्यासह पिंपरी चिंचवड शहरातील माजी सैनिक, राजकीय पदाधिकारी, बजरंग दलाचे पदाधिकारी, सामाजिक संघटना आणि हजारोंच्या संख्येने नागरिकांनी रॅलीत सहभाग घेतला.

क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मारकास पुष्प अर्पण करून या भव्य तिरंगा रॅलीची सुरुवात झाली. प्रसंगी, माजी सैनिक व अधिकारी आणि हुतात्मा सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला.

हातात तिरंगा ध्वज घेतलेले नागरिक 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आणि 'भारतीय सेना झिंदाबाद' च्या घोषणा देत होते. संपूर्ण रॅलीमध्ये देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत होता.

'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वीतेची चित्रफीत दाखवण्यात आली, ज्याने उपस्थितांच्या मनात अभिमानाची भावना जागृत केली. तत्पूर्वी, माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला, ज्यांनी देशासाठी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. 300 फूट भारतीय तिरंगी ध्वजाने सर्वांचे लक्ष वेधले.

# श्री संत तुकाराम महाराज पालखी रथासाठी 3 बैलजोड्या विकत घेणार

## श्री संत तुकाराम महाराज आषाढी पायी वारी पालखी प्रस्थान सोहळा महिन्यावर




**पिंपरी | प्रतिनिधी**

श्री संत तुकाराम महाराज आषाढी पायी वारी पालखी प्रस्थान सोहळा महिन्यावर आला आहे. या वर्षी श्री संत तुकाराम महाराज पालखी रथासाठी तीन बैलजोड्या संस्थानतर्फे विकत घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पायी वारीच्या पार्श्वभूमीवर श्री संत तुकाराम महाराज संस्थानची बैठक देहूगावात शुक्रवारी (दि. १६) आयोजित करण्यात आली होती. यामध्ये संस्थानच्या निकषात बसतील अशा दोन बैलजोड्या श्री संत तुकाराम महाराज पालखी रथासाठी खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तर, एक सर्वसाधारण बैलजोडी चौघडा गाडीसाठी विकत घेण्यात येणार आहेत.

श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष हभप जालिंदर महाराज मोरे, पालखी सोहळाप्रमुख वैभव महाराज मोरे, गणेश महाराज मोरे, दिलीप महाराज मोरे विश्वस्त उमेश महाराज मोरे, विक्रमसिंह महाराज मोरे, लक्ष्मण मोरे आदींच्या उपस्थितीत हा निर्णय घेण्यात आला.

दरवर्षी श्री संत तुकाराम महाराज पालखी रथाच्या बैलजोड्यांसाठी अर्ज करण्याचे आवाहन देहू देवस्थान संस्थानच्या वतीने करण्यात येते. त्यानुसार, इच्छुक बैलगाडा मालक, शेतकरी आपल्या बैलजोड्या जुंपण्यासाठी अर्ज करतात. त्यातून देवस्थानच्या निकषात आणि नियमांत बसणाऱ्या बैलजोड्यांची निवड करण्यात येत होती. अशा वेळी काहीजण नाराज होत होते. त्यामुळे यावर्षी देहू देवस्थान संस्थान स्वतःच विकत बैलजोड्या घेणार असल्यामुळे कुणीही अर्ज करू नये, असे आवाहन पालखी सोहळाप्रमुख हभप दिलीप महाराज गोसावी यांनी केले आहे.

श्री संत तुकाराम महाराज पालखी रथास जोडण्यासाठी कोल्हापूर, सातारा आणि कर्नाटकच्या बाजारपेठेत जाऊन बैलांची पाहणी करून तीन जोड्या विकत घेण्यात येणार आहेत. त्याचे नियोजन येत्या दोन-तीन दिवसांत करण्यात येणार असल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# वर्तुळाकार रस्त्याच्या कामाला सुरुवात

## अडीच वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याच्या उद्दिष्टानुसार कार्यारंभ आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे (एमएसआरडीसी) प्रस्तावित वर्तुळाकार रस्त्याचे (रिंग रोड) काम सुरू करण्यात आले आहे. निविदा प्रक्रिया राबवून निवड करण्यात आलेल्या कंपन्यांना अडीच वर्षांत काम पूर्ण करण्याच्या उद्दिष्टानुसार कार्यारंभ आदेश दिले आहेत. त्यामुळे संबंधित नऊ कंपन्यांनी वाडेबोल्हाई, खडकवासला, सिंहगड, मुळशी, उर्से, चाकण, हिंजवडी, सोरतापवाडी या ठिकाणी एकत्रितपणे प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केली आहे.




पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाकडून १७२ किलोमीटर लांब आणि ११० मीटर रुंदीचा वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग करण्यात आले आहेत. त्यासाठी सुमारे ४२ हजार कोटी रुपयांचा खर्च होणार असून, पश्चिम भागातील ९९ टक्के, तर पूर्व भागातीलही ९८ टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. विधानसभेची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीच मंत्रिमंडळाच्या बैठकीत ४२ हजार ७११ कोटी रुपयांच्या सुधारित प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार पूर्व भागात सात आणि पश्चिम भागात पाच टप्पे आहेत.

‘राज्य सरकारच्या आदेशानुसार संबंधित नऊ कंपन्यांना तातडीने कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. अडीच वर्षांच्या आत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट नऊ कंपन्यांना दिले आहे. त्यामुळे तातडीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे. प्राथमिक स्तरावर पावसाळ्याच्या दृष्टीने डोंगराळ भागातील सपाटीकरण, नदी-नाल्यांवरील पूल, भरावाच्या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. पावसाळा सुरू झाल्यावर इतर कामे सुरू असतील,’ असे रस्ते महामंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी सांगितले.

‘संबंधित कंपन्यांनी वेळेत काम पूर्ण न केल्यास त्यांना राज्य सरकारच्या नियमानुसार दंड आणि भरपाई द्यावी लागणार आहे. परिणामी, वेळेत काम पूर्ण करण्याची जबाबदारी कंपन्यांची असून, तातडीने कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत,’ असे त्यांनी नमूद केले.

### अपेक्षित जमीन ताब्यात

» पूर्व भागासाठी ८५८.९६ हेक्टर, सरकारी १०.३१ हेक्टर, तसेच वनजमीन ७४.९७ हेक्टर अशी एकूण १०५४.०३ हेक्टर, तर पश्चिम भागासाठी ६४४.११ हेक्टर खासगी, ७.०३ हेक्टर सरकारी, तर ४१.५२ हेक्टर वन अशी एकूण ६९२.६६ हेक्टर जमीन आवश्यक आहे. रिंग रोडसाठी एकूण सुमारे १७४० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. अवघ्या ६ हेक्टर जमिनीचे भूसंपादन बाकी आहे. वेगवेगळ्या ठिकाणी जमीन असून, लवकरच संबंधित जमीन ताब्यात घेतली जाणार असल्याची माहिती रस्ते महामंडळाकडून देण्यात आली.

# विलंबाने तिकीट घेतल्यास प्रवाशावर कारवाई

## प्रवाशांनी बस थांब्यावरून बसमध्ये बसतानाच तिकीट काढून प्रवास करावा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बसमधून फुकट प्रवास करणाऱ्या प्रवाशांबरोबरच विलंबाने तिकीट घेणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी मोबाइल ॲप ऑनलाइन तिकीट प्रणाली विकसित केली आहे. या ऑनलाइन ॲपला तांत्रिक अडचण आल्यास किंवा सुट्या पैशांवरून वाद टाळण्यासाठी अत्याधुनिक ई मशिन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. प्रवाशांनी बस थांब्यावरून बसमध्ये बसतानाच तिकीट काढून प्रवास करावा, असे आवाहन ‘पीएमपी’ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील ‘जीवनवाहिनी’ असलेल्या पीएमपीला पुणेकरांचा मोठा प्रतिसाद असतानाही २०२४-२५ या आर्थिक वर्षात संचलन तूट ७६६ कोटींपर्यंत पोहोचली आहे. त्या पार्श्वभूमीवर पीएमपी प्रशासनाने आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी मार्गांचा विस्तार, नवीन मार्गांवर बसचे संचलन, तसेच ऑनलाइन तिकिटासाठी ऑनलाइन ई मशिन, ॲप आणि इतर सेवांमधील त्रुटी दूर करून नवीन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

प्रवाशांनी बसलेल्या बसथांब्यावरून त्वरित तिकीट घेणे अनिवार्य करण्यात आले असून, ऑनलाइन तिकीट घेताना नेटवर्कमुळे तिकीट वितरित होण्यास विलंब होत असल्यास वाहकाकडून ई-मशिनद्वारे रोखीने तिकीट घ्यावे. जे प्रवासी तिकीट वेळेत घेणार नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा या वेळी देण्यात आला आहे.

> प्रवाशांकडून गर्दीचा फायदा घेत विलंबाने तिकीट घेतले जात आहे. अनेक प्रवासी नियोजित ठिकाणी उतरण्यापूर्वीचा थांबा सांगून तिकीट काढून कमी पैशांत प्रवास करीत असून वाहक आणि प्रवाशांमध्ये वादविवादाच्या घटना होत आहेत. प्रवाशांकडून गर्दी आणि ठरावीक अंतरावर असणारे बसथांबे याचा गैरफायदा घेतला जात असल्याने प्रवासी ज्या बस थांब्यावर बसेल तेथूनच ऑनलाइन तिकीट काढणे अनिवार्य करण्यात आले आहे.
>
> **- नितीन नार्वेकर, सह व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

# शासकीय रुग्णालयांनी दाखल करून न घेतलेल्या बेवारस रुग्णांच्या जिवावर संकट

## पुणे जिल्ह्यात फक्त वायसीएम व ससून रुग्णालयांमध्येच बेवारस रुग्णांवर उपचार केले जात असल्याने या दोन रुग्णालयांवरचा ताण वाढत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या (यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) दाखल केले जाणारे बेवारस रुग्ण अनेकदा इतरत्र उपचारासाठी पाठविले जातात. मात्र ससून रुग्णालयाने अशा रुग्णांना उपचारासाठी नकार देण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. पुणे जिल्ह्यात फक्त वायसीएम व ससून रुग्णालयांमध्येच बेवारस रुग्णांवर उपचार केले जात असल्याने या दोन रुग्णालयांवरचा ताण अधिक वाढत आहे.

याच आठवड्यात टीबीग्रस्त एका बेवारस रुग्णाला वायसीएम रुग्णालयातून पुण्यातील औंध येथील सरकारी औंध उरो रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तेथेही डॉक्टरांनी संबंधित रुग्णाला दाखल करून घेण्यास नकार दिला. विशेष म्हणजे, याप्रकरणी एका लोकप्रतिनिधींनी देखील रुग्णालयाशी संपर्क साधून विनंती केली, तरीही संबंधित डॉक्टरांनी त्यास दाखल करून घेतले नाही. परिणामी तो रुग्ण पुन्हा वायसीएममध्ये आणण्यात आला. वायसीएम रुग्णालयात टीबी आजारावर उपचाराची सोय नाही. त्यामुळे अशा रुग्णावर कसे उपचार करायचे, असा प्रश्न येथील सामाजिक कार्यकर्त्यांना पडला आहे.




### तोपर्यंत रुग्णवाहिका उभीच

» अनेकदा वायसीएम रुग्णालयातून रुग्णवाहिकेतून रुग्णास ससून रुग्णालयात पाठविण्यात येते. तेथे कमीत कमी तीन ते चार तासांचा वेळ लागतो. जोपर्यंत रुग्णास ॲडमिट केले जात नाही. तोपर्यंत रुग्णवाहिका आणि त्यासोबत असलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांस परत माघारी येता येत नाही. त्यामुळे अनेक चालक बेवारस रुग्णास ससून रुग्णालयात नेण्यास तयार होत नाहीत.

वायसीएममधील सामाजिक कार्यकर्त्यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, “या रुग्णांवर उपचार करण्याचा अधिकार नाही का?” असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. यातील काही रुग्ण मानसिक आजारांनी ग्रस्त असतात, तर काही गंभीर आजारांमध्ये आहेत. त्यांची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

ससून रुग्णालयातही वारंवार बेवारस रुग्णांना दाखल करून घेण्यास टाळाटाळ केली जाते, असा आरोप वायसीएम रुग्णालयातील मधील कर्मचाऱ्यांनी केला आहे. काही वेळा हे रुग्ण रस्त्यावर, उड्डाणपूलाखाली, स्टेशन परिसरात अर्धनग्न अवस्थेत आढळून येतात. त्यांना वायसीएममध्ये प्राथमिक उपचार देऊन जर वायसीएम रुग्णालयात त्या आजारावरील उपचारासाठी साय नसल्यास ससून रुग्णालयात पाठविले जाते. मात्र जेव्हा ते रुग्ण ससून रुग्णालयात नाकारले जातात, तेव्हा त्यांच्या जीविताचा धोका अधिकच वाढतो.

ही गंभीर परिस्थिती पाहता, बेवारस रुग्णांसाठी स्वतंत्र उपचार केंद्र किंवा शासनाकडून ठोस धोरण आखले जाणे अत्यावश्यक आहे. केवळ वायसीएम आणि ससूनवर जबाबदारी सोपवणे ही अन्यायकारक बाब असल्याची भूमिका सामाजिक कार्यकर्त्यांनी मांडली आहे. याप्रकरणी महापालिका, आरोग्य विभाग व राज्य शासनाने तातडीने लक्ष घालण्याची गरज व्यक्त होत आहे.

> ज्या बेवारस रुग्णांवर वायसीएम रुग्णालयात उपचाराची सोय नसते, अशाच रुग्णांना पुण्यातील ससून रुग्णालयात पाठविण्यात येतो. अनाथ, गरीब रुग्णांना ससून आणि वायसीएम रुग्णालयाशिवाय अन्य पर्याय नाही. मात्र बेवारस रुग्णांना दाखल करून घेतले जात नाही. खूप विनंत्या केल्यावर घेतलेच तरी शुल्लक बाबी काढून त्रास दिला जातो.
> - कुंडलिक आमले, सामाजसेवक, वायसीएम रुग्णालय

> वायसीएम रुग्णालयात २०१० पासून रिअल लाइफ रिअल पीपल ही संस्था कार्यरत आहे. ही संस्था बेवारस रुग्णांवर उपचारादरम्यान मदत करते. रुग्णास डिस्चार्ज दिल्यानंतर आवश्यक असल्यास पिंपरीतील सावली निवारा केंद्रात ठेवते. त्यास रोजगारासाठी मदतही केली जाते.
> - एम. ए. हुसेन, संस्थापक अध्यक्ष, रिअल लाइफ रिअल पीपल

# रहिवाशांचे पालिका अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप

## महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पैसे घेऊनदेखील ही कारवाई केल्याचा गंभीर आरोप या रहिवाशांनी केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीपात्रालगत गट क्र. 90 मधील ही जागा रहिवासी झोनमध्ये दाखविल्याने आम्ही ती खरेदी करून घरे बांधली. महापालिका व अन्य शासकीय विभागांनी सोयीसुविधा परविल्या. या सुविधा पुरविताना महापालिका प्रशासनाला हा भाग निळ्या पूररेषेत येत असल्याचे समजले नव्हते का? असा उद्विग्न सवाल कारवाईदरम्यान उपस्थित असलेल्या याठिकाणच्या रहिवाशांनी केला आहे. तर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पैसे घेऊनदेखील ही कारवाई केल्याचा गंभीर आरोप या रहिवाशांनी केला आहे.

इंद्रायणीनदी पात्रालगत चिखली गावच्या हद्दीतील गट क्र. 90 मधील सुमारे पाच एकर भुभाग रहिवासी भागातील असल्याचे दाखवत बिल्डरकडून 20 लाख रुपये प्रति गुंठा दराने या नागरिकांनी खरेदी केली आहे. या प्रकाराला स्थानिक राजकीय पुढाऱ्यांचे बळ होते. या जागेच्या विक्रीतून संबंधित बिल्डरने 20 ते 25 कोटींची माया जमविल्याची माहिती रहिवाशांनी दिली. ही कारवाई रोखण्यासाठी अनेक राजकीय पुढाऱ्यांनी दबाव आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, कारवाई होणारच असल्याचे समजताच हे पुढारी परागंदा झाले. त्यांचे संपर्क क्रमांक लागेनासे झाल्याचे चित्र होते. त्यामुळे हतबलतेने कारवाई पाहण्याशिवाय या रहिवाशांसमोर दुसरा पर्याय नव्हता.



### पैसे घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई कधी?

» या बांधकामांना पाठिशी घालण्यासाठी शिरसाट नावाची एक व्यक्ती या रहिवाशांकडून पन्नास हजार ते एक लाख रुपये रोख रक्कम घेऊन जात असायची. मात्र आता कारवाई झाल्यानंतर ही रक्कम महापालिकेच्या नेमकी कोणत्या अधिकाऱ्याकडे पोहोच केली जात होती, याचा तपास करण्याची मागणि या रहिवाशांनी केली आहे. तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या बिट निरीक्षकांवर कोणती कारवाई होणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

कोणातही राजकीय पुढारी मदतीला येत नसल्याने हतबल रहिवाशांना डोळ्यासमोर आपले घर पाडताना अश्रू अनावर झाले. आयुष्यभराची जमापुंजी व कर्ज काढून बांधलेले घर डोळ्यासमोर नेस्तनाबूत होताना पाहण्याचे दुर्भाग्य या रहिवाशांच वाट्याला आले. आता घरासाठी काढलेले कर्ज कसे फेडायचे? असा प्रश्न या रहिवाशांना पडला आहे. तर बिल्डरने आमची फसवणूक केली असून, त्याच्याकडे आम्ही दिलेली रक्कम मागणार असल्याचे या रहिवाशांनी सांगितले.

इंद्रायणी नदीपात्रालगत जागा रहिवासी झोनमध्ये दाखविल्याने आम्ही ती खरेदी करून घरे बांधली. महापालिका व अन्य शासकीय विभागांनी सोयीसुविधा परविल्या. या सुविधा पुरविताना महापालिका प्रशासनाला हा भाग निळ्या पूररेषेत येत असल्याचे समजले नव्हते का? असा उद्विग्न सवाल कारवाईदरम्यान उपस्थित असलेल्या याठिकाणच्या रहिवाशांनी केला आहे

# कर्जमाफीचं आश्वासन हवेत विरलं

## पेरणीचा हंगाम जवळ आला; पण बँकांचे दरवाजे बंद : शेतकरी पुन्हा सावकाराच्या दारात!

**पुणे | प्रतिनिधी**

खरिपाची तयारी सुरू झाली आहे. आभाळावर ढग दिसू लागले, पण मनात अजूनही चिंता गडद आहे. कारण मशागत झाली खरी, पण बियाणं, खते आणि पैसा नाही. वडापुरीसह इंदापूर, बारामती, दौंड परिसरातील शेतकरी पुन्हा एका कठीण आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. 2023 मध्ये अत्यल्प पाऊस आणि त्यानंतरच्या वर्षी मिळालेलं पीक भावाअभावी वाया गेलं. मागील दोन वर्षांत झालेल्या सततच्या तोट्यामुळे शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर वाढला आहे. अनेक शेतकरी बँकांचे कर्ज थकवू शकलेले नाहीत आणि त्यामुळे आता नव्या पेरणीसाठी त्यांना बँकांकडून कर्ज मिळत नाही.

मॉन्सून अंदमानात दाखल झाला आहे. त्यामुळे पेरणीच्या तयारीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु झाली. मशागती उरकल्या आहेत. आता खते, बियाण्यांची खरेदी करावी लागेल. पण मागचेच कर्ज थकल्याने बँका नवे कर्ज देणार नाहीत. पावसाची चाहूल लागल्यानंतर शेतकरी पेरणीपूर्व कमांना वेग देतात. पेरणीपूर्व मशागती करून शेतकरी पेरणीयोग्य पावसाची वाट पाहतात. पेरणीसाठी खते, बी-बियाणे आणि अवजारांची खरेदी करतात. त्यासाठी शेतकऱ्यांची पैशांची गरज बँकांकडून मिळणाऱ्या पीककर्जातून पूर्ण होते. दरवर्षी नवं-जूनं करून शेतकरी काम भागवतात. पण मागची दोन वर्षे अडचणीची ठरले. 2023 मध्ये पाऊसच कमी पडला. शेतीत घातलं तेवढही मिळालं नाही. बाजारात भाव जास्त दिसला पण हातात पीकच कमी आले होते. गेल्या वेळेस पीकही चांगले आले. मात्र बाजारात भावच मिळाला नाही त्यामुळे शेतकरी अधिक अडचणीत आला.

शेतीचा एक हंगाम तोट्याचा गेला तर तो भरून येण्यासाठी किमान पुढचे तीन हंगाम चांगले जावे लागतात. पण सलग दोन हंगामात शेतकऱ्यांना तोटा झाला. त्यामुळे शेतकरी बँका भरू शकले नाहीत त्यामुळे कर्जे थकली. बँकांनी कर्जे भरण्यासाठी शेतकऱ्यांसाठी तगादा लावला.



### सावकाराचं सावट पुन्हा डोकं वर काढतंय

» बँकांकडून नकार आल्यामुळे काही शेतकरी खासगी सावकारांकडे वळू लागले आहेत. परंतु त्यांचा व्याजदर प्रचंड जास्त. काही ठिकाणी शेती गहाण ठेवून पैसे उभे केले जात आहेत.सावकाराकडून पैसा घेतो पण रात्रभर झोप लागत नाही. त्याचं व्याज शेताच्या कडेलाही उगवत नाही. पण दुसरा पर्यायच काय?

### तारणहार आभाळ की सरकार

» शेतकऱ्यांची स्थिती इतकी बिकट झाली आहे की जर त्वरित कर्जमाफी जाहीर झाली नाही, तर यंदाच्या खरिपाचे क्षेत्र घटू शकते. परिणामी अन्नधान्य उत्पादनावरही परिणाम होईल. शेतकऱ्याचं आयुष्य हे आभाळाकडून आणि सरकारकडून आलेल्या उत्तरांवर अवलंबून आहे पण दोघांनीही जर पाठ फिरवली, तर या मातीचा माणूस कुठे जाईल?.

“ सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. आताही सत्तेतील मंत्री कर्जमाफी देऊ, असे सांगत आहेत. कर्जमाफी देणार नाही, असे कुणीही स्पष्ट बोलत नाही. पण कर्जमाफी कधी होणार? याविषयी सरकार सांगत नाही. सरकारने आता कर्जमाफी केली तर किमान शेतकऱ्यांना खरिपाची तयारी वेळेत करता येईल. अन्यथा कर्जमाफी अभावी खरिपाच्या पेरण्यांवर परिणाम होऊ शकतो. शेतकऱ्यांना पुन्हा सावकारांच्या दारात जावे लागेल. यामुळे कर्जबाजारीपणा वाढून आत्महत्याही वाढतील अशी भीती आहे.

-रवींद्र सरडे, संचालक कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखाना

“ शेतीचं काम थांबत नाही, पण शेतकऱ्याचं मन मात्र थांबतं. बियाण्यांची किंमत वाढली, खते महागली आणि हातात पैसे नाहीत. बँकेने मागचं कर्ज भरल्याशिवाय नवीन कर्ज द्यायला नकार दिला आहे! सात बारा कोरा करण्याचा शब्द दिला होता ना? मग तो पाळायचा की विसरायचा हे सरकारने ठरवावं! शेतकऱ्याने निवडून दिलं, आता त्याच्या जीवनाचं उत्तरदायित्व तरी घ्या!

-लक्ष्मण शिंदे, सेवानिवृत्त शिक्षक व सामाजिक कार्यकर्ते

# स्वच्छ, हरित, सुरक्षित वारीसाठी सूक्ष्म नियोजन करा


## विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासह मागील पालखी सोहळ्याप्रमाणे सुरक्षित, अपघात मुक्त, स्वच्छ आणि हरित वारी संपन्न करण्यासाठी विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आषाढी वारी पूर्व तयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपायुक्त विजय मुळीक उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, मानाच्या पालख्यांच्या विश्वस्तां सोबत बैठक घेऊन त्यांच्या सूचने नुसार कार्यवाही करावी. वारी कालावधीत अन्न शुद्धतेची खात्री करण्यासाठी आवश्यकते नुसार अन्न व औषध प्रशासना कडील अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी आणि येत्या काळात अन्न भेसळ करणाऱ्याविरोधात व्यापक मोहीम राबवावी. पालखी सोहळ्या संदर्भातील राज्यस्तरीय बैठकीपूर्वी पालखी सोहळ्याची तयारी पूर्ण करावी. इतर जिल्ह्यात किंवा विभागात बदली झालेल्या अनुभवी अधिकाऱ्यांची सेवा घेण्याबाबत संबंधितांना विनंती करावी. सर्व अधिकाऱ्यांनी पालखी मार्गाचा संयुक्त दौरा करून व्यवस्थे बाबत परस्पर समन्वय ठेवावा, असे निर्देश त्यांनी दिले.



### पालखी मार्ग खड्डे मुक्त करा

» पालखी मार्ग खड्डे मुक्त राहतील व उत्तम वाहतूक व्यवस्थापन राहील याची काळजी घ्यावी. पालखी मार्गावर पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. घाट परिसरात दरड कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. तिन्ही जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील व्यवस्थेबाबत एकत्र पुस्तिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

### वृक्ष लागवड करा

» पालखी मार्गावर मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी. पालखी सोहळ्यादरम्यान आणि नंतरही स्वच्छता रहावी यासाठी आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहांची संख्या वाढवावी. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील यासाठी आवश्यक उपाय योजावेत. नीरा नदी परिसर स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. पालखी पुढे गेल्यावर मागील गावात त्वरित स्वच्छता करावी. वारकऱ्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देतांना रुग्णवाहिकेत पुरेशा प्रमाणात औषधे आणि वैद्यकीय अधिकारी असतील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या आहेत.